# माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला

नोंदणी क्र. F - ७८१ | सांगोला, जि. सोलापूर, महाराष्ट्र

# वार्षिक अहवाल

## एप्रिल २०२५ – मार्च २०२६

**ध्येय**

*ग्रामीण महिला सबलीकरण • दर्जेदार शिक्षण • जलसंधारण*

## Vision (ध्येय)

ग्रामीण स्त्री ला केंद्रस्थानी ठेवून तिच्या कुटुंबाच्या सक्षमीकरणातून स्वावलंबी समाज निर्मितीचा संकल्प.

## Mission (उद्देश)

ग्रामीण भागातील समाजघटकांच्या सर्वांगीण सबलीकरणासाठी आणि त्यांच्यामध्ये शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन व पर्यावरण साक्षरता अशा विषयांसंबंधी जाणीव जागृती व्हावी, म्हणून त्यांचे संघटन करणे, तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, विविध प्रकारचे उपक्रम योजणे.

# विभाग १ | महिला सबलीकरण

## १.१ आरोग्य व किशोर-किशोरी विकास वर्ग

### अ) महिला आरोग्य तपासणी

- निजामपूर येथे २४ महिलांची हिमोग्लोबिन व ब्लड शुगर तपासणी. सर्व महिलांचे हिमोग्लोबिन समाधानकारक; आहार मार्गदर्शन केले.
- राजुरी येथे ३० महिलांची हिमोग्लोबिन व ब्लड शुगर तपासणी. सर्व महिलांचे हिमोग्लोबिन समाधानकारक.

**एकूण लाभार्थी महिला : ५४**

### ब) किशोरी प्रशिक्षण

- एक दिवसीय किशोरी प्रशिक्षण : प्रार्थना, बौद्धिक विषय चर्चा, हस्तव्यवसाय (पेपर फुल, स्टँड, वॉल हँगिंग), स्वच्छता प्रकल्प.

**लाभार्थी किशोरी शिक्षिका : १२**

### क) किशोर-किशोरी मार्गदर्शन कार्यक्रम

| ठिकाण / शाळा | विषय | लाभार्थी |
|---|---|---|
| सोनंद | प्रेम, मैत्री व आकर्षण | इ. ८ वी ते १० वी – १५० विद्यार्थी |
| सह्याद्री शाळा | कळी उमलताना – मासिक पाळी माहिती | ८० किशोरी |
| आदर्श विद्यालय, महूद | प्रेम, मैत्री व स्वैराचार | इ. ६ वी ते ९ वी – ~१२० मुली |
| हनुमान विद्यालय, वासूद | कळी उमलताना + खेळ साहित्य वाटप | ७३ किशोरी |

### एकत्रित लाभार्थी सारांश

| विभाग | लाभार्थी संख्या |
|---|---|
| महिला आरोग्य तपासणी | ५४ महिला |
| किशोरी शिक्षिका प्रशिक्षण | १२ शिक्षिका |
| किशोर-किशोरी मार्गदर्शन कार्यक्रम | ४२३ विद्यार्थी |
| एकूण लाभार्थी | ४८९ व्यक्ती |

## १.२ अन्यायाला प्रतिकार – महिला समुपदेशन केंद्र, मंगळवेढा

### वार्षिक केस सारांश (एप्रिल २०२५ – मार्च २०२६)

वर्षभरात केंद्राकडे ७१४ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी १०० प्रकरणांची नोंद व १०० प्रकरणे यशस्वीरीत्या निकाली काढण्यात आली. ६१४ प्रकरणे One Time समुपदेशनाद्वारे हाताळण्यात आली. गरजेनुसार १९ प्रकरणांमध्ये पोलिसांची मदत घेण्यात आली व ०६ प्रकरणे DV कडे वर्ग करण्यात आली.

### महिला मेळावे व जनजागृती कार्यक्रम

या कालावधीत DV Act, महिला हक्क व जनजागृतीसाठी निरनिराळ्या ठिकाणी एकूण १३ मेळावे आयोजित करण्यात आले.

## १.३ कौशल्य विकसन

- 'गुंफण' ब्रँड उद्घाटन: महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी 'गुंफण' या नावाने ब्रँडचे उद्घाटन. महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यास सुरुवात.
- केक तयार करण्याचे प्रशिक्षण : १० महिलांनी सहभाग. विविध प्रकारचे केक तयार करण्याचे प्रात्यक्षिक व व्यवसाय संधींबाबत मार्गदर्शन.
- कुटुंबाचे आर्थिक व्यवस्थापन मार्गदर्शन : ३३ महिलांनी सहभाग. कुटुंब अर्थसंकल्प, बचत, गुंतवणूक व आर्थिक नियोजन.
- बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण (पू. अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) : १३ लाभार्थी – १००% निकाल.
- सिंचन परिषदेत सहभाग : कौशल्य विकास केंद्राच्या खाद्यपदार्थ स्टॉलला महाराष्ट्रातील विविध संस्था व मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद. महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री.
- मेंदी प्रशिक्षण वर्ग : १८ महिलांनी सहभाग. आकर्षक मेंदी डिझाईन्स शिकून स्वयंरोजगाराच्या संधी.

## १.४ आर्थिक स्वावलंबन – बचतगट विभाग

### कार्यक्षेत्र

- बचतगटांचे कार्य २५ गावांमध्ये सुरू आहे.
- संस्थेच्या माध्यमातून ९३ बचतगटांचे नियमित मार्गदर्शन व व्यवस्थापन.

### प्रमुख कार्यक्रम व उपक्रम

- हिमोग्लोबिन व ब्लड शुगर तपासणी शिबिरे.
- सर्व्हायकल कॅन्सर जनजागृती कार्यक्रम.
- जागतिक ग्रामीण महिला दिनानिमित्त ३०० महिलांचा मेळावा.
- संस्थेच्या कार्यावर आधारित 'देवराई' या राजमुग्धा लिखित पुस्तकाचे प्रकाशन मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या शुभहस्ते प्रकाशन .
- गरजू महिलांना साडी वाटप, धान्यकिट वितरण, परसबाग बियाणे वाटप.
- उद्यम आधारकार्ड व बचतगट व्यवस्थापन मार्गदर्शन.
- ९३ बचतगटांची माहिती डिजिटल स्वरूपात संकलित.

## अर्थसहाय्य

- स्वयंसहायता बचतगटातील महिलांना खालील प्रकारे अर्थसहाय्य करण्यात आले
- उत्कर्ष महिला उद्योग विभातून 9 महिलांना प्रत्येकी 20,000/- प्रमाणे 1,80,000/-
- वैद्यकीय खर्चासाठी एका महिलेला 20,000/-
- प्रा. यामातो कावाकामी फौंडेशन,पुणे तर्फे शेळीपालन,व्यवसाय, शिलाई, पिकोफॉल , घरघंटी, म्हैस खरेदी साठी 33 महिलांना ₹3,59,000/- आणि संस्थेच्या शेंगदाणा चटणी प्रकल्पासाठी 2,00,000/- अर्थसहाय्य

# २ | दर्जेदार शिक्षण

## २.१ उत्कर्ष पूर्व प्राथमिक विद्यालय

### विद्यार्थी संख्या

| तपशील | संख्या |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | १७१ |

### वर्ग रचना

- एकूण वर्ग : शिशुरंजन (१), शिशुवर्ग (२), बालवर्ग (३)

### इमारत उद्घाटन

- बालक मंदिरच्या नवीन इमारतीचे उद्घाटन सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. जयकुमारजी गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. सध्या बालक मंदिर नवीन इमारतीत सुरु आहे .

### प्रकल्प उपक्रम

मुलांच्या सर्वांगीण ज्ञानवृद्धीसाठी दर महिन्याला प्रकल्प मांडण्यात आले : त्यांची नावे खालीलप्रमाणे -

- थंडीतील कपडे • साधनखेळ • दिव्यांची शाळा • स्वच्छता • रानमेवा
- मी व माझी जोडी • विजेवर चालणाऱ्या वस्तू • धारदार वस्तू
- माणूस घडविण्यासाठी तन, मन व मेंदू विकसित करूया • आला उन्हाळा तब्येत सांभाळा • रंगपंचमी

### स्पर्धा उपक्रम

दरमहिन्याला एक शारीरिक/बौद्धिक स्पर्धा :

- साधी उडी • बेडूक उडी • धावणे • लंगडी • बादलीत चेडू टाकणे
- डोक्यावर टोपली घेऊन चालणे • कला व चित्रकला स्पर्धा • सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा

### आरोग्य व पोषण

- नियमित आरोग्य तपासणी व स्वच्छतेच्या सवयी.
- Water Filter द्वारे शुद्ध पिण्याचे पाणी; नियमित सेवा करार.
- नियमित पालक बैठका; वाडीवस्त्यांवरील मुलांसाठी वाहन सुविधा.

## २.२ उत्कर्ष प्राथमिक विद्यालय

| तपशील | संख्या |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | ५४० |

### प्रमुख उपक्रम व कार्यक्रम

- नागपंचमी – खेळ व मेहंदी उपक्रम.
- हर घर तिरंगा उपक्रम.
- संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज ७५० जयंती वर्षानिमित्त पसायदान पठण.
- गणेशोत्सव – गणेश प्रतिष्ठापना, दुर्वा विक्री, हस्तव्यवसाय स्पर्धा. गणेश मिरवणूक – टिपरी, लेझीम, पथनाट्य.
- महिला बचत गट मेळावा – देवराई पुस्तक प्रकाशन व चित्रफित लोकार्पण.
- शिवजयंती रंगभरण स्पर्धा; मराठी दिन – विविध उपक्रम.
- दहीहंडी उत्सव; रोटरी क्लब देशभक्ती गीत नृत्य स्पर्धा – द्वितीय क्रमांक.
- स्नेहसंमेलन विषय : 'मराठी महिने सण व उत्सव' – प्रत्येक वर्गातून प्रबोधनपर नाटक.
- माजी विद्यार्थी ऋषीकेश शिवाजी इंगोले यांचा सत्कार; माजी विद्यार्थी (१९८४-८५) गेट टूगेदर – फुलझाडांची रोपे भेट.

### विक्री कौशल्य उपक्रम

- इ. १ली – दुर्वा विक्री | इ. २री – आठवडा बाजार
- इ. ३री – सप्तधान्य विक्री | इ. ४थी – पणत्या विक्री | इ. ४थी – संचयी बचत योजना

### सहल व क्षेत्रभेटी

- इ. १ली – वाढेगाव संगम; इ. २री – वाटंबरे (श्री. संजय शिंदे मळा); इ. ३री – कुंभारवाडा, अकोला.
- इ. ४थी – वाटंबरे बंधारा व पत्रावळी कारखाना; इ. १ली- २री – अभिषेक मळा, पाकणी (सोलापूर).
- इ. ३री-४थी – पन्हाळा किल्ला व कोल्हापूर पॅलेस.

### सुविधा व विकासकार्य

- पूर्व प्राथमिक विभागाची नूतन इमारत उद्घाटन.
- रोटरीकडून १० TV प्राप्त; ४०० फोल्डिंग टेबल प्राप्त.

## २.३ उत्कर्ष माध्यमिक विद्यालय

| तपशील | संख्या |
|---|---|
| एकूण विद्यार्थी पट | ७४८ |

### शैक्षणिक व प्रशासकीय उपक्रम

- नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत.
- शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आचारसंहिता प्रशिक्षण.
- इ. ५वी ते १० वी साठी नियमित शिक्षक-पालक सभा.

## स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक यश

- इ. ५वी शिष्यवृत्ती : ८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत; कु. मनस्वी मंगेश कुलकर्णी – जिल्हा व राज्यस्तर.
- इ. ८वी शिष्यवृत्ती : १ विद्यार्थी गुणवत्ता यादीत.
- गुणवंत विद्यार्थ्यांना देणगीदारांच्या सहकार्याने शिष्यवृत्ती वाटप.
- डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा : इ. ६वीचे ३ विद्यार्थी प्रात्यक्षिक फेरीसाठी पात्र.

## वक्तृत्व, हस्ताक्षर व बौद्धिक स्पर्धा

- तालुकास्तरीय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा – प्रथम क्रमांक; जिल्हास्तरासाठी पात्रता.
- तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा – द्वितीय क्रमांक.
- राज्यस्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धा (अष्टपैलू संस्कृती कला अकादमी, मुंबई) -राज्यात प्रथम , तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके.
- तालुका बुद्धिबळ स्पर्धा – द्वितीय व तृतीय क्रमांक.

## क्रीडा क्षेत्र

- तालुकास्तरीय योगासन स्पर्धा – प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक; जिल्हास्तरासाठी निवड.
- कुस्ती स्पर्धा (मुलींचे विविध गट) – प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक.
- मैदानी क्रीडा – धावणे व लांब उडी – उल्लेखनीय यश.
- देशभक्तीपर गायन स्पर्धा – द्वितीय क्रमांक.

## कला व सांस्कृतिक क्षेत्र

- गुरुपौर्णिमेनिमित्त कीर्तनरूपी अध्यात्मिक प्रबोधन.
- गीतगायन स्पर्धा, रांगोळी प्रदर्शन, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ.

## कौशल्य विकास व क्षेत्रभेटी

- IBT विभागामार्फत पशुपालन क्षेत्रभेट.
- इ. ८ वी – औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तंत्रकौशल्य प्रदर्शन भेट.
- Portable Planetarium – आकाशगंगा, ग्रह व ताऱ्यांविषयी प्रत्यक्ष अनुभव.
- MSFC विभागात 3D Printer बसविण्यात आला.

## शिक्षक प्रशिक्षण

- Story Telling विषयावर कार्यशाळा.
- विज्ञान व गणित – प्रयोग व शैक्षणिक खेळणी तयार करण्याचे विशेष प्रशिक्षण.

## सामाजिक उपक्रम

- जागतिक योगदिन, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, हिंदी दिन उत्साहात साजरे.
- सायबर क्राईम व व्यसनमुक्ती मार्गदर्शन.
- विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या निधीतून पूरग्रस्तांसाठी किराणा साहित्य वाटप.
- रेन वॉटर हार्वेस्टिंग उपक्रमासाठी सहकार्य.

### पुरस्कार व सन्मान

- विद्यालयास आदर्श शाळा पुरस्कार २०२५ जाहीर.
- विद्यालयातील पर्यवेक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार.
- शासकीय रेखाकला परीक्षा – विद्यालयाचा निकाल १००%.

## २.४ Multi Skill Foundation Course (MSFC) – उत्कर्ष विद्यालय

इ. ८ वी व ९वी साठी २०२५-२६ पासून MSFC सुरू. विज्ञान आश्रम, पाबळ यांचे मार्गदर्शन.

### अभ्यासक्रम – चार प्रमुख विभाग

- अभियांत्रिकी (Engineering)
- शेती व पशुपालन (Agriculture & Animal Husbandry)
- ऊर्जा व पर्यावरण (Energy & Environment)
- गृह व आरोग्य (Home & Health)

### वर्षातील प्रमुख उपक्रम

- शिवणकाम : मोजमाप, कटिंग व मशीनवर शिवणकाम – स्वावलंबनाची भावना व लघुउद्योग समज.
- कुंभारकाम (Pottery) : मातीची निवड, मळणी, आकार देणे – सर्जनशीलता व हातकौशल्य.
- Tie & Dye प्रकल्प : कापडावर विविध डिझाईन – रंगसंगती, डिझायनिंग व लघुउद्योग संधी.
- महिला गृह उद्योग भेट : उत्पादन, पॅकेजिंग, विक्री, मार्केटिंग अभ्यास; उद्योजकांशी संवाद.
- शेती उपक्रम : वांगी लागवड प्रकल्प – लागवड, देखभाल, उत्पादन; शिक्षक-पालकांना विक्री –
- खरेदी-विक्री, नफा-तोटा शिक्षण.

# विभाग ३ | जलसंधारण

## वर्षा कोश प्रकल्प

सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १० शाळांमध्ये सेवावर्धिनी संस्थेच्या सहकार्याने 'वर्षा कोश' तयार करण्यात आला.

- दुष्काळी सांगोला तालुक्यात पावसाच्या पाण्याचे संकलन व संधारण.
- जिल्हा परिषदेच्या १० शाळांमध्ये वर्षा कोश निर्मिती.
- सेवावर्धिनी संस्थेशी सहकार्य करून प्रकल्पाची अंमलबजावणी.
- शालेय मुलांमध्ये पाणी बचत व जल साक्षरता जागृती.

### मान्यवर भेटी

- शाळेच्या माजी शिक्षिका मा.मितश्री अग्निहोत्री (पतकी).
- मा.जया पानवलकर – AI विषयक मार्गदर्शन.
- मा. निरूपमा देशपांडे (संस्थापिका, संपूर्ण बांबू केंद्र, मेळघाट).
- मा. जयकुमार गोरे (पालकमंत्री) व मा. कादर शेख साहेब (शिक्षणाधिकारी) – पूर्व प्राथमिक विभाग उद्घाटन.
- श्री.जयदिप रानडे व श्री. राजदिप रानडे(अमेरिका) ,श्री. अँड्रयू लेडरर (अमेरिका) व मा. हेमलता होनवाड; डॉ. गिरीषा सेवक व मा. संध्याताई काणेगावकर.

- मा.गौरी कुलकर्णी व सहकारी (ज्ञान प्रबोधिनी, हराळी); श्री. व सौ. फडके; श्री. व सौ. गोडबोले – देविज ग्रंथालय उपक्रम माहिती.

## पुरस्कार

- पुरस्कार
- सूर्योदय फाउंडेशन सांगोला व एल के पी मल्टीस्टेट व सूर्योदय अर्बन परिवाराचा 'मातृशक्ती' पुरस्कार संस्था संस्थापिका 'डॉ. संजीवनी केळकर' यांना प्रदान
- सूर्योदय फाउंडेशन जीवन गौरव पुरस्कार २०२५ : 'मा. शालिनी कुलकर्णी' (संस्था कोषाध्यक्षा).
- संस्थेचे गुणवंत कर्मचारी पुरस्कार : श्री. मुरलीधर चौरे (प्राथमिक विभाग)
  सौ. सुवर्णा सपताळ (माध्यमिक विभाग)
  सौ. विद्या म्हेत्रे (पूर्व प्राथमिक विभाग)
  सौ. निहारिका ताकभाते (संस्था विभाग)
  सौ. स्वाती टेके (सेविका)

## समारोप

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला यांनी वर्ष २०२५-२६ मध्ये महिला सबलीकरण, दर्जेदार शिक्षण आणि जलसंधारण या तीन आधारस्तंभांवर सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कार्य केले. समुपदेशन, आरोग्य, कौशल्य विकास, बचतगट, शालेय उपक्रम, स्पर्धा परीक्षा आणि जल साक्षरता या सर्व क्षेत्रांत संस्थेने ग्रामीण महाराष्ट्रात सकारात्मक बदलाचे काम केले आहे.

— माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला —

## काही क्षणचित्रे


'गुंफण उत्पादने विक्रीकेंद्राचे उद्घाटन


महिलांची HB तपासणी


नवरात्री निमित्त 2 गावांमध्ये महिला मेळावे संपन्न


किशोरींसाठी राख्या तयार करण्याचे प्रशिक्षण


बचतगट महिलांना सेवावर्धिनी,पुणे तर्फे बियाणे वाटप – लाभार्थी 75


'देवराई' पुस्तक प्रकाशन मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या शुभहस्ते





उत्कर्ष पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते उद्घाटन संपन्न



पूर्व प्राथमिक शाळेत 'आला उन्हाळा . तब्बेत श्री सांभाळा' प्रकल्प सादरीकरण



विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार



गणपती उत्सवात दुर्वा विक्री



गुरुपौर्णिमा वेळी माजी विद्यार्थिनीचे विद्यालयात कीर्तन



उत्कर्ष विद्यालयात शिक्षिकांचे क्षमता प्रशिक्षण संपन्न



गुणवंत विद्यार्थी सत्कार



बुद्धिबळ स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी



राज्यस्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश ( राज्यात प्रथम )



कुस्ती विजेता मुलींचा संघ



स्थानिक पूरग्रस्तांना विद्यालयातर्फे धान्यवाटप



विद्यालयात विज्ञान प्रदर्शन



सांगोला ITI कॉलेज मध्ये क्षेत्र भेट




सूर्योदय फाउंडेशन सांगोला व एलकेपी मल्टीस्टेट व सूर्योदय अर्बन परिवाराचा 'मातृशक्ती' पुरस्कार संस्था संस्थापिका डॉ. संजीवनी केळकर यांना प्रदान

++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++++

========================================================================

## देणगीसाठी तपशील खालील प्रमाणे -

खात्याचे नाव – माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान,

बँकेचे नाव- बँक ऑफ महाराष्ट्र ,सांगोला

खाते क्रमांक – 60046857205 ,

IFSC No. – MAHB0001467

HDFC बँकेचा QR कोड

2) संस्थेच्या matabalak.org या वेबसाईट वरून 'Donate Us' मधून देणगी देऊ शकता.

संपर्कासाठी मोबाईल क्र. 7588222250(WA) ,

E mail – matabalak.utkarshapratishthan@gmail.com, mbupsangola@gmail.com

Website- www.matabalak.org